# पीठ गिरणी व लघुउद्योजक संघटना, पुणे जिल्हा

कार्यालय : मु. पो. पाईट, ता. खेड, जि. पुणे

नोंदणी क्रमांक :

जावक क्र.

दिनांक १५ मार्च १९८८

मित्र हो,

सरकारने सध्याचे हॉलर्स बंद करण्याचा निर्णय घेऊन जे आदेश काढले आहेत, त्याच्या विरोधात गेल्या दोन-तीन महिन्यांपासून आपण प्रयत्न करत आहोत. प्रथम आपण खेडचे तहसिलदार व नंतर पुणे जिल्हाधिकारी यांना निवेदने दिली. हा महाराष्ट्र शासनाचा आदेश असल्यामुळे आपल्याला याबाबतीत काही करता येणार नाही असे त्यांनी सांगितले. त्यानंतर आपण सामुदायिक धरण्याचा कार्यक्रम ठरवूनही दोन वेळा काही अडचणींमुळे होऊ शकला नाही.

दरम्यान ८ मार्च रोजी मी मुंबईला महाराष्ट्र सरकारच्या पुरवठा खात्याचे सचिव यांची भेट घेऊन त्यांच्याबरोबर चर्चा केली. त्यात केंद्र सरकारने भाताचे उत्पादन वाढण्यासाठी सध्याच्या हॉलर्सऐवजी शेलर्स बसवून नुतनीकरणासाठी कायदा केला आहे. अनेक अडचणींनंतर आज दहा वर्षांनी तो अंमलात येत आहे, तेव्हा ही अडचण आहे, असे त्यांनी सांगितले. परंतु नंतर झालेल्या बोलण्यात आपली भूमिका व व्यावहारिक अडचणी त्यांनी नीटपणे समजून घेतल्या आहेत. त्यांना काही माहिती आपल्या संघटनेच्या वतीने काही माहिती द्यावयाची आहे. म्हणून आपण प्रथम सभासद वाढवण्यावर भर दिला पाहिजे. तसेच प्रत्येक सभासदाकडून खालील माहिती गोळा करायची आहे. ही माहिती पुरवठा खात्याकडे पाठवल्यावर त्याचा पाठपुरावा करण्याचे सचिवांनी मान्य केले आहे. या पार्श्वभूमीवर आपण चिकाटीने प्रयत्न केल्यास आपला प्रश्न सुटू शकेल असे मला वाटते.

आपल्या आजूबाजूच्या गावातून जास्तीत जास्त सभासद करून त्यांच्याकडून सोबतच्या फॉर्ममध्ये माहिती भरून घेऊन ते फॉर्म माझ्याकडे परत पाठवावेत.

कळावे,

आपला,

अजित सप्रे